Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 12/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## व्यासंगी इतिहास संशोधक वि. का. राजवाडे



विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांचा जन्म १२ जुलै १८६४ रोजी पुण्यात झाला. १८८२ मध्ये पुण्यातून ते मॅट्रिक झाले. मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेज व पुण्यास डेक्कन कॉलेज येथे महाविद्यालयीन शिक्षण घेऊन १८९० मध्ये बी. ए. झाले. १८९१ मध्ये ते पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले, पण अडीच वर्षांनी १८९३ मध्येच त्यांनी ती नोकरी सोडली. पुढे आयुष्यात त्यांनी कधीही, कसलीही नोकरी केली नाही. पुढे ते पुणे, सातारा, वाई, धुळे, मिरज, तळेगाव-दाभाडे इत्यादी ठिकाणी कमी-अधिक वर्षे वास्तव्य करून असले, तरी बहुधा महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही ऐतिहासिक साधनांच्या आणि प्राचीन साहित्याच्या शोधात सतत हिंडत राहिले. दऱ्याखोऱ्यातून प्राचीन अवशेष पाहात व कोनाकोपऱ्यातून जुनी दप्तरे गोळा करीत असतानाच त्यांचे लेखनकार्यही अव्याहतपणे सुरू होते.

१८९४ पासून स्वत: सुरू केलेल्या भाषांतर तसेच कोल्हापूर येथील समर्थ, तसेच ग्रंथमाला, विश्ववृत्त, सरस्वती मंदिर, प्राचीप्रभा इत्यादी नियतकालिकांतून ते भरपूर लिहू लागले. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधनें' या शीर्षकाचे अस्सल मराठी साधनांचे २२ खंड त्यांनी संपादून प्रसिद्ध केले. (१८९८-१९१७) 'राधामाधव विलास चंपू' आणि 'महिकावतीची बखर' हे २ जुने ग्रंथ त्यांनी अनुक्रमे १९२२ व १९२४ मध्ये संपादून छापले. ज्ञानेश्वरीची फार जुनी हस्तलिखित पोथी, निङ्त विचार, सुबंतविचार, संस्कृत भाषेचा उलगडा, महाराष्ट्राचा वसाहतकाल असे काही त्यांनी संपादिलेले व लिहिलेले ग्रंथ त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध झाले. समर्थ रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयी त्यांनी पुष्कळ लिहिले. 'मराठी धातुकोश', 'नामादि शब्द व्युत्पत्ति कोश' इत्यादी ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध होऊ शकले. राजवाड्यांच्या लेखांचे आणि प्रस्तावनांचे काही खंड शं. ना. जोशी आदींनी संपादून प्रसिद्ध केले आहेत. धुळ्याच्या संशोधकच्या अंकांमधून त्यांचे समग्र स्फुट लेखन प्रकाशित झालेले आहे. अशा या व्यासंगी इतिहास संशोधकाचे ३१ डिसेंबर १९२६ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 12, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401